# विद्यार्थ्यांना वेळेचा सदुपयोग करण्यासाठी प्रवृत्त करा

## सरपंच धरती नागोजी : केरी सरकारी प्राथमिक विद्यालयात उन्हाळी शिबिर उत्साहात

**टीम दैनिक हेराल्ड**

हरमल, दि. १८ : शालेय विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन आहे, असे केरी– तेरखोल सरपंच धरती नागोजी यांनी केले.

केरी मधलावाडा सरकारी प्राथमिक विद्यालयात आयोजित केलेल्या उन्हाळी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष शैला नाईक, समितीच्या सल्लागार निवृत्त शिक्षिका शिला कुबल तसेच शाळा प्रमुख यशश्री नाईक आदी उपस्थित होत्या.

सरपंच नागोजी म्हणाल्या की, शिक्षक मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत असतात. नेहमी विविध उपक्रमातून मुलांना मार्गदर्शन करतात व मुलांचा व्यक्तिमत्व विकास घडवत असतात. मुलांमध्ये वेगवेगळ्या कला कौशल्य विकसित झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो.



केरी : मधलावाडा सरकारी प्राथमिक विद्यालयात उन्हाळी शिबिरात सहभागी झालेली मुले.

शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी कलानंद शिक्षिका किमया गावस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या शिबिरात सेल्फ डिफेन्स म्हणजेच स्वतःची सुरक्षा यावर मुलांना कराटे प्रशिक्षक बुधाजी हरमलकर, उपलेक्ष हसापुरकर यांनी धडे दिले. सुंदर हस्ताक्षर कसे काढावे यावर गोवा राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक रावजी जाधव यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका किमया गावस यांनी कागदाच्या वेगवेगळ्या कलाकृती तयार करून घेतल्या. यावेळी विद्यार्थी चिराग नार्वेकर , ईशा वेंगुर्लेकर,दुर्वा केरकर ई विद्यार्थ्यांनी शिबिराबद्दल आनंद व्यक्त केला.

या शिबिराचे सूत्रसंचालन शाळा प्रमुख यशश्री नाईक यांनी केले तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन सहशिक्षिका सोनाली हरमलकर, पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका मिलन कोरखणकर व इंग्रजी शिक्षिका विद्या मोरजकर यांनी केले. यावेळी मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. तसेच पालकांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल कौतुक केले.

# आंबोलीत ८ लाखांची गोवा बनावटीची दारू जप्त

**टीम दैनिक हेराल्ड**

सावंतवाडी, दि. १८ : बांदा–संकेश्वर महामार्गावर आंबोली घाटातील सनसेट पॉईंट येथे गोवा बनावटीची लाखो रुपयांची बिगरपरवाना दारू वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीला आंबोली पोलिसांनी रंगेहाथ पकडले. तपासणीसाठी थांबवले असता तो न थांबल्याने थरारक पाठलाग करीत पोलिसांनी घाटात त्याला ताब्यात घेतले. यशवंत शितोळे (वय ३४, रा. बेळगाव) असे त्याचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी सुमारे ३.३० वाजताच्या सुमारास पोलिसांनी ही कारवाई केली. या कारवाईत सुमारे एक लाख रुपये किमतीच्या दारूसह ८ लाख रुपये किंमतीची ह्युंडाई एक्सेंट कार देखील पोलिसांनी जप्त केली जप्त केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यशवंत शितोळे हा त्याच्या ताब्यातील (एम एच ०४ जीडी ९६४३ ) क्रमांकाच्या ह्युंडाई एक्सेंट कारमधून आंबोली घाटातून भरधाव वेगात जात होता. पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला, परंतु त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. संशय आल्याने पोलिसांनी त्याचा पाठलाग करून सनसेट पॉईंट येथे त्याला ताब्यात घेतले.

गाडीची तपासणी केली असता, पोलिसांना एकूण १ लाख ०१ हजार ९८५ रुपये किमतीची गोवा बनावटीची दारू आढळून आली. यात किंगफिशर प्रीमियम लॉगर बिअर, ५०० मिलीच्या २०७ टीन (किंमतः ४६,५७५ रुपये), किंगफिशर स्ट्रॉग प्रीमियम लॉगर बिअरः ७५० मिलीच्या ५७ बाटल्या (किंमतः १८,८१० रुपये), ट्युबॉर्ग प्रीमियम बिअर ओरिजिनल बीनः ७५० मिलीच्या ५५ बाटल्या (किंमतः १७,६०० रुपये), मॅजिक मोमेंट्स रिमिक्स ग्रीन एप्पल फ्लेवर्ड व्होडकाः ७५० मिलीच्या ०८ बाटल्या (किंमतः ९,१२० रुपये) व मॅकडॉनेल्स नं. १ सेलिब्रेशन मॅच्युई त्रीपल एक्स रम १८० मिलीच्या ४५ बाटल्या (किंमतः ९,००० रुपये) या दारू सोबत पोलिसांनी ८ लाख रुपये किंमतीची ह्युंडाई एक्सेंट कार देखील जप्त केली आहे. याप्रकरणी पोलिस अंमलदार मनिष शिंदे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सावंतवाडी पोलिस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली आंबोली पोलिस दूरक्षेत्रातील पोलिस हवालदार दिपक शिंदे, मनिष शिंदे आणि पोलिस कॉन्स्टेबल राजेश नाईक यांनी यशस्वीपणे पार पाडली. पुढील तपास आंबोली पोलिस करत आहेत.



नावेली : विविधा कर्मचारी पतसंस्थेच्या उद्घाटनप्रसंगी प्रताप गावस,रमेश सिनारी व अभ्यास दौऱ्यातील सहभागी.

# विविधा पतसंस्थेच्या अभ्यास दौऱ्याला सुरुवात

**टीम दैनिक हेराल्ड**

**साखळी, दि. १७** : नावेली – साखळी येथील विविधा कर्मचारी पतसंस्थेचा तीन दिवशीय अभ्यास दौरा नुकताच विविधा उच्च माध्यमिक विद्यालय येथून सुरू करण्यात आला आहे. या दौऱ्याच्या उद्घाटनाला विविधा उच्च माध्यमिक विद्यालयाचे व्यवस्थापक प्रताप गावस, प्राचार्य रमेश सिनारी व दौऱ्यात सहभागी उपस्थित होते. प्रताप गावस यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रवासाला सुरुवात झाली. नावेली येथील विविधा उच्च माध्यमिक विद्यालयातील विविधा कर्मचारी सहकारी संस्थेचा रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ही तीन दिवशीय शैक्षणिक सहल सर्व सभासदांसाठी आयोजित करण्यात आली आहे.

विविधा कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष एकनाथ मांद्रेकर आणि इतर संचालक मंडळाच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे. प्रताप गावस व प्राचार्य रमेश सिनारी यांनी यशस्वी प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

अभ्यास दौऱ्यात भाग भांडवल, कर्ज पद्धत, जमीन तारण कर्ज, वाहन, सुवर्ण व गृहपयोगी वस्तू खरेदी कर्ज अशा अनेक उपक्रमाबद्दल माहिती करून घेतली जाणार आहे. ओरोस, देवगड, रत्नागिरी, गणपतीपुळे या परिसरातील सहकारी क्रेडिट सोसायटीचा अभ्यास करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी ओरोस सिंधुदुर्गनगरी आणि रत्नागिरी जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी रत्नागिरी यांना भेट देण्यात येणार आहे.

# नानोड्यात बसथांबा निवारा शेडचे उद्घाटन

**टीम दैनिक हेराल्ड**

डिचोली, दि. १८ : इनरव्हील क्लब ऑफ म्हापसा एलीट तर्फे नुकतेच नानोडा येथील बस थांबा निवारा शेडचे डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जीर्ण अवस्थेत असलेल्या या बसथांब्याची दुरुस्ती करून इनरव्हील क्लब ऑफ म्हापसा एलिटने हा निवारा शेड लोकार्पण केला. उसप, भटवाडी नानोडा या भागातील जनतेसाठी हा निवारा शेड खूपच महत्त्वाचा असल्याने दुरवस्था झालेल्या या निवारा शेडची डागडुजी होणे अत्यंत गरजेची होती.



नानोडा : बस थांबा निवारा शेडच्या उद्घाटनप्रसंगी आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, सोबत अध्यक्ष वनिता फळारी, प्रिया परब, दिप्ती फळारी, पंच नीलम कारापूरकर, श्याम हरमलकर, मंगलदास कानोळकर व इतर.

उद्घाटनप्रसंगी क्लबच्या अध्यक्ष वनिता फळारी, सचिव प्रिया परब, खजिनदार दिप्ती फळारी, स्थानिक पंच नीलम कारापूरकर, माजी सरपंच श्याम हरमलकर, मंगलदास कानोळकर, गावचे ग्रामस्थ व क्लबचे इतर सदस्य उपस्थित होते. या कामात फळारी भगिनींचे विशेष योगदान लाभले. इनरव्हील क्लबच्या कार्याबद्दल ग्रामस्थांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# काणकोण आजपासून विकासकामांचा धडका

## गालजीबाग येथे रस्त्याच्या संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे उद्घाटन

**टीम दैनिक हेराल्ड**

आगोंद, दि. १८ : काणकोण मतदारसंघात उद्या शुक्रवारपासून दि.१९पासून कामाचा धडाका पुन्हा होणार आहे. सभापती रमेश तवडकर सतत पाठपुरावा करत असल्यामुळेच हे शक्य होणार आहे, अशी माहिती पाटणे येथील दिनेश नाईक यांनी दिली.

शनिवार दि.१९ रोजी सकाळी १० वा. पैंगीण, महालवाडा येथील आनंद सुधीर यांच्या निवासस्थानाजवळ पैंगीण ते गालजीबाग रस्त्याला संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे उद्घाटन स्थानिक आमदार तथा सभापती रमेश तवडकर यांच्याहस्ते करण्यात येईल. यावेळी स्थानिक सरपंच, पंचसदस्य व भाजप मंडळाचे पदाधिकारी तसेच अन्य उपस्थित रहाणार आहेत. याकामाचा एकंदरीत खर्च रु.२ लाख ७० हजार खर्च अपेक्षित आहे. दि. २१ रोजी, श्रीस्थळ, गावडोंगरी येथील शासकीय माध्यमिक शाळा ते मणे जंक्शनपर्यंतच्या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण कामाचा शुभारंभ झिल्तावाडी येथे सकाळी १० वा. सभापती तवडकर यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. रु.११ लाख, १० हजार या कामाकरता एकंदरीत खर्च अपेक्षित असून त्यामुळे स्थानिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार आहे.

मंगळवार, दि.२२ रोजी सकाळी ११ वा. काणकोण पालिका क्षेत्रातील पाळोळे येथील देवगी पुरुष जवळचा वीज ट्रान्सफॉर्मर उन्नतीकरण (अपग्रेडेशन) करण्याचे उद्घाटन सभापती तवडकर यांच्या हस्ते होईल. दि.२३ रोजी सकाळी ११ वा. राजबाग,तारीर या ठिकाणी वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन सभापती तवडकर यांच्याहस्ते करण्यात येईल. दि. २४ रोजी, सकाळी ११ वा. डॉ. अमन यांच्या क्लिनीकजवळ वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन सभापती तवडकर यांच्या हस्ते होईल. दि.२५ रोजी सकाळी ११ वा. गायतोंडेवाडा या ठिकाणी वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन होईल. दि.२६ रोजी सकाळी ११ वा. पाटणे, देवगी पुरुष या ठिकाणी वीज ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन सभापती तवडकर यांच्या हस्ते करण्यात येईल. पालिका क्षेत्रातील ५ प्रभागात एकूण ५ वीज ट्रान्सफॉर्मरचे उन्नतीकरण (अपग्रेडेशन) करण्यात आले असून ते १०० केव्ही ऐवजी २०० केव्ही करण्यात आलेले आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. यावेळी नगराध्यक्ष सारा देसाई, उपनगराध्यक्ष गंधेश मडगावकर, नगरसेवक रमाकांत नाईक गावकर, लक्ष्मण पागी, शुभम कोमरपंत व अन्य नगरसेवक तसेच मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# बांदा महापुरुष देवस्थानात वार्षिक पूजा

**टीम दैनिक हेराल्ड**

बांदा, दि. १८ : बांदा–देऊळवाडी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौक येथील श्री देव महापुरुष देवस्थान येथे आयोजित वार्षिक श्री सत्यनारायण महापूजा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात झाला. महापुरुष मित्रमंडळातर्फे या सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी श्री देव महापुरुष तसेच श्री सत्यनारायण पूजा करण्यात आली. पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली नाना सावंत यांनी सपत्निक पूजन केले. भाविकांच्या उपस्थितीत दुपारी महाआरती होऊन सर्वांच्या कल्याणासाठी गा–हाणे घालण्यात आले. त्यानंतर महाप्रसादास आरंभ झाला. संध्याकाळी भजन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने

या सोहळ्याचा लाभ घेतला. महापुरुष मित्रमंडळ ,आमची वाडी देऊळवाडी मंडळाचे सर्व कार्यकर्ते, महिला सदस्य तसेच येथील व्यापारी बांधवांनी या सोहळ्याच्या आयोजनासाठी विशेष परीश्रम घेतले.

# शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी नियमित व्यायाम करा!

**टीम दैनिक हेराल्ड**

पणजी, दि. १८ : विद्यार्थ्यांनी शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी नियमितपणे व्यायाम केला पाहिजे, असे प्रतिपादन योगातज्ज्ञ डॉ. पंकज सायनेकर यांनी केले. गोवा संगीत महाविद्यालयातील मनस्वी–समुपदेशन सेल व शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या सहकार्याने कुजिरा बांबोळी येथील मैदानात आयोजित केलेल्या क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धांच्या उद्घाटन सोहळ्यात डॉ. पंकज सायनेकर प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

**▸योगातज्ज्ञ डॉ.पंकज सायनेकर : गोवा संगीत महाविद्यालयाचा क्रीडादिन उत्साहात**

शशांक मक्तेदार उपस्थित होते. क्रीडादिनाची सुरुवात ध्वजारोहण व प्रार्थनेने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मार्च पास्ट केले. महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक रुपल च्यारी यांनी सर्वांना खिलाडूवृत्तीची शपथ दिली. आदिती नाईक, आचल च्यारी, नीरज चोडणकर, प्रमथ मातोंडकर यांनी टॉर्च रिले केला. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. पंकज सायनेकर यांनी ॲथलेटिक मीट सुरू झाल्याची घोषणा केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशांक मक्तेदार यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश आणि हेतू स्पष्ट केला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी १००मीटर, २०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर धावणे, गोळा फेक, डिस्कस थ्रो, भाला फेक, बीजीएमआय या स्पर्धा घेण्यात आल्या.

क्रीडादिनानिमित्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी मनोरंजनात्मक खेळ आयोजित करण्यात आले होते. स्टिक स्टॅण्ड ऑफ, ८००मीटर धावणे, लेग क्रिकेट, वर्ड वॉरियर्स यांचा समावेश यामध्ये आहे.

प्रमथ परब मातोंडकर, आकांक्षा गिरोडकर यांना अनुक्रमे मुलांमधील आणि मुलींमधील २०२४२०२५ या वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. तर सर्वोत्तम शिस्तबद्ध खेळाडू म्हणून प्रतिमा साळगावकर यांना गौरविण्यात आले. बक्षीस वितरणाला प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट डॉ. अनिकेत केरकर, प्राचार्य डॉ. शशांक मक्तेदार, नोडल अधिकारी प्रकाश देसाई, शारीरिक शिक्षण संचालक रुपल च्यारी, समुपदेशक श्रुती कळंगुटकर आदी मान्यवर उपस्थित होते. रुपल च्यारी यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संगणक विज्ञानात करिअरच्या विपूल संधी : प्रा. हरमलकर

**टीम दैनिक हेराल्ड**

**साखळी, दि. १८** : सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा काळ आहे. हे युग संगणक युग असल्याने संगणक विज्ञानात करिअरच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत, असे प्रतिपादन धेंपे सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल हरमलकर यांनी केले. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साखळी येथे आयोजित करण्यात आलेल्या लॉजिक टू लाँच : बिल्डिंग अ करिअर इन कॅम्प्युटर सायन्स या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. ही कार्यशाळा संगणक विज्ञान विभागाने डीबीटी स्टार कॉलेज योजनेंतर्गत आयोजित केलली होती. पुढे बोलताना हरमलकर यांनी लॉजिक बिल्डिंग, डीबगिंग आणि संगणक विज्ञानात बीएसस्सी पूर्ण केल्यानंतर करिअरच्या असणाऱ्या संधी विद्यार्थ्यांना विशद केल्या. या कार्यशाळेचे समन्वयन संगणक विज्ञानातील सहाय्यक प्राध्यापक पूजा नाईक यांनी केले. लॉजिक टू लाँच : बिल्डिंग अ करिअर इन कॉम्प्युटर सायन्स या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत महाविद्यालयातील ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**CHANGE IN NAME**

I, **MOHMMADALI MUGUTSAB GULEDKOP** R/O H.No. T-14, KASSARWADA, BETHORA, North Goa 403401. Holder of Indian Passport No.**X9408000,** hereby change my name from **MOHAMADALI MAHAKUTSAB GOLEDKOP,** to **MOHMMADALI MUGUTSAB GULEDKOP,** Here after in all my dealings & document I will be known as **MOHMMADALI MUGUTSAB GULEDKOP.** If anybody has any objection they should inform to Passport Office within 15 days from the Publication of this Notice.

SD/- **MOHMMADALI MUGUTSAB GULEDKOP**

**CHANGE IN NAME**

I, **FRANCIS CABRAL** r/o H. NO. 58 SINQUERIM VOILE BHAT CANDOLIM, BARDEZ, North Goa, 403515, like to change my name from **FRANCIS ANTON CABRAL** to **FRANCIS CABRAL** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **FRANCIS CABRAL.**

# वजरी माध्यमिक विद्यालयात वाचन साधनावर कार्यशाळा

**टीम दैनिक हेराल्ड**

पेडणे, दि. १८ : शासकीय विद्यालय वजरी येथे ६७ वी वाचन साधना कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ममता नाईक, शिक्षक सुभाष शेटगावकर, ज्येष्ठ शिक्षक विकास आजगावकर व इतर शिक्षक उपस्थित होते. ममता नाईक यांनी शेटगावकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रास्ताविक, स्वागत व परिचय शिक्षक विकास आजगांवकर यांनी केले.

या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना निवृत्त शिक्षक सुभाष शेटगावकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत वाचन वेग व आकलन क्षमता वाढविण्यासाठी वाचन विषयक प्रात्याक्षिके घेण्यात आली. काना, मात्रा नसलेली व काना मात्रा असलेली अक्षरे पटकन ओळखण्याचा सराव दाखवण्यात आला. शास्त्रशुद्ध नजर फिरवण्याच्या सरावाने वाचन वेग वाढविणे. त्यातून आपल्या अक्षरांची प्रगती होते.



वजरी : सुभाष शेटगावकर यांचा गौरव करताना मुख्याध्यापिका ममता नाईक. बाजूला शिक्षक विकास आजगावकर व इतर.

द्रुष्टिचा आवाका व रूंद पानावरील मजकुर भराभर वाचण्याचा सराव कसा करता येतो, त्याची प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

वाचन कमी होण्याची कारणे व वाचनाची आवड निर्माण कशी करावी हे उदाहरणे देऊन स्पष्ट केले. कार्यशाळेचे प्रशिक्षक सुभाष शेटगांवकर यांचा स्मृतिचिन्ह देऊन ममता नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. आभार शिक्षिका निष्ठा कोळंबकर यांनी मानले.



म्हापसा : जायंट ग्रुप ऑफ म्हापसा सिटीचे नवनिर्वाचित मंडळ.

# जायंट ग्रुप ऑफ म्हापसा सिटीचा अधिकारग्रहण सोहळा

**टीम दैनिक हेराल्ड**

म्हापसा, दि. १८ : जायंट ग्रुप ऑफ म्हापसा सिटीचा अधिकार ग्रहण सोहळा दत्तवाडी येथील इंद्रधनुष्य हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुहास धुरी उपस्थित होते. कविता अमेरकर यांना २०२५ अध्यक्ष म्हणून शपथ देण्यात आली. अध्यक्ष म्हणून रेवती शिरोडकर व समिरा स्वार प्रशासकीय, संचालक म्हणून सिया शिरसाट नाटेकर, वित्त संचालक म्हणून सुरेश वेर्णेकर, संचालक म्हणून नविता वेरेकर, सोनम हिरलोस्कर, दीपा शिरोडकर, स्नेहा परब व दिव्या वाळवे यांना शपथ देण्यात आली. अधिकारी सुधीर रिवणकर यांनी त्यांना शपथ दिली. फेडरेशनचे अध्यक्ष संजय बाणावलीकर व इतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. मावळते प्रशासकीय संचालक रेवती शिरोडकर यांनी प्रकल्प अहवाल सादर केला. दिव्या वाळवे यांनी सूत्रसंचालन केले तर सिया शिरसाट नाटेकर यांनी आभार मानले.